25 AUG 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरातील फौंड्री उद्योग हे देशाचे वैभव : प्रफुल्ल वानखेडे

## शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय फौंड्री दिनानिमित्त व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : फौंड्री उद्योग हे कोल्हापूर शहराबरोबरच देशाचे वैभव आहे. या क्षेत्रामध्ये प्रामाणिकपणे कार्यरत असणाऱ्या मराठी माणसाला पुढे जाण्यासाठी मोठी संधी आहे. फौंड्री उद्योगामध्ये जगातील सर्वात चांगली गुणवत्ता देणारे शहर म्हणजे कोल्हापूर ही खात्रीची जागा आहे, असे प्रतिपादन प्रसिध्द उद्योगपती प्रफुल्ल वानखेडे यांनी केले.

राष्ट्रीय फौंड्री दिनानिमित्त मंगळवारी शिवाजी विद्यापीठ उद्योग कक्ष व इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फौंड्रीमन कोल्हापूर चॅप्टर यांच्यातर्फे वानखेडे यांचे 'नवी औद्योगिक क्रांती आणि संधी' या विषयावर व्याख्यान झाले. राजर्षी शाहू सभागृहामध्ये झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठामध्ये उद्योग कॉम्प्लेक्स उभे करण्याचा मानस आहे. उद्योजक एम. बी. शेख यांनी फौंड्री तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रमाची माहिती दिली. विद्यापीठ उद्योग कक्षाचे समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत केले.

आयआयएफ कोल्हापूरचे अध्यक्ष महेश दाते यांनी प्रास्ताविक केले. सचिव मिलिंद बिरादार यांनी परिचय करून दिला. खजिनदार राहुल पाटील यांनी आभार मानले. यावेळी डॉ. पी. डी. राऊत, डॉ. डी. टी. गायकवाड, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. सचिन पन्हाळकर, गजानन कडूकर, डॉ. सुभाष माने उपस्थित होते.




शिवाजी विद्यापीठात मंगळवारी प्रफुल्ल वानखेडे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी कुलगुरु डॉ.डी.टी. शिर्के यांच्या हस्ते वानखेडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

### कोल्हापूर ही कष्टकऱ्यांची भूमी

वानखेडे म्हणाले, साखर कारखाने आणि फौंड्री उद्योग एकत्र येऊन मोठ्या प्रमाणात ऊर्जा निर्मिती करणे शक्य आहे. पाचव्या औद्योगिक क्रांतीमध्ये चांगल्या जीवन पध्दतीसाठी सुशिक्षित लोकांचे होणारे स्थलांतर थांबवणे आवश्यक आहे. कोल्हापूर ही काम करणाऱ्या कष्टकऱ्यांची भूमी आहे. येथील फौंड्री उद्योगाची ओळख ही प्रामाणिकपणाची आहे.

2 5 AUG 2023

महासत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांना सतत कार्यमग्न ठेवणे गरजेचे

## डॉ.डी.टी.शिर्के

निपाणी,ता.२३(प्रतिनिधी)-

संस्था ज्ञानाची भाषा जाणते.भविष्यात स्वायत्तता येण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांना राज्य,प्रांत, भाषा, गरीब, श्रीमंत या सीमांच्या पलीकडे जाऊन ते भारतीय असल्याचे भान देऊन त्यांना ज्ञान देण्यासाठी शिक्षकांनी सदैव तत्पर असले पाहिजे. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान कौशल्यपूर्वक वापरून विद्यार्थ्यांना सतत कार्यमग्न ठेवण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्नशील असणे हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अपेक्षित आहे,असे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के यांनी सांगितले.

जनता शिक्षण मंडळ संचालित देवचंद महाविद्यालय अर्जुननगर येथे कुलगुरू डॉ.शिर्के यांनी राष्ट्रीय शैक्षणिकधोरण-२०२० (एन.इ.पी.) याबाबत मार्गदर्शन केले.त्याप्रसंगी ते बोलत होते.



अर्जुननगरः येथे मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के, शेजारी आशिष शाह, प्राचार्या जी.डी इंगळे व इतर.

डॉ.शिर्के पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांनी स्वतः समाजोपयोगी संशोधन करणे, स्वयं-उद्योगी असण्याकडे आपला कल ठेवला पाहिजे आणि शिक्षकांनी सुद्धा यासाठीच प्रयत्नशील असले पाहिजे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशिष शाह म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ही होऊ घातलेली विद्यार्थ्यांच्या जीवनातील सकारात्मक बाब असून विद्यार्थ्यांनी अध्ययन क्षेत्रात झोकून देऊन कार्यरत रहावे. विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून निर्माण होत असलेल्या या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास संस्थांनी समजून घेऊन प्रभावीपणे त्याची अंमलबजावणी करावी. याप्रसंगी जनता शिक्षण मंडळाच्या उपाध्यक्षा डॉ.तृप्ती शाह, खजिनदार सुबोध शहा, ट्रस्टी प्रकाशभाई शाह, संचालक प्रल्हाद पाटील, प्रदीप मोकाशी, प्रदीप शाह आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वागत व प्रास्ताविक प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे यांनी केले. पाहुण्यांची ओळख इतिहास विभाग प्रमुख डॉ.सी.एम.नाईक यांनी करून दिली. याप्रसंगी विद्यार्थी रोहण पावले हा दक्षिण कोरिया येथे संशोधक म्हणून जात असल्याबद्दल त्याचा सत्कार कुलगुरू डॉ.शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला.डॉ.पी.वाय. पाटील यांनी तयार केलेली संख्याशास्त्र प्रात्यक्षिक कार्य पुस्तिका कुलगुरू डॉ.शिर्के व जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशिष शाह व सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ. सुजाता पाटील व डॉ.अनिता चिखलीकर यांनी केले.आभार उपप्राचार्य डॉ. पी. पी. शाह यांनी मानले.

लोकमत

# यशस्वितेसाठी वक्तशीरपणा, शिस्त गरजेची : डी. टी. शिर्के

## नवागत विद्यार्थ्यांशी साधला संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी वक्तशीरपणा आणि शिस्त अंगीकारली पाहिजे. इतरांपेक्षा वेगळे बनण्यासाठी वाचन कौशल्य वृद्धिंगत करावे. विद्यार्थीदशेतच ध्येय निश्चित केल्यास आयुष्याचा प्रवास सुखकर होतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शुक्रवारी केले.

विद्यापीठ परिसरामधील मराठी, हिंदी, इंग्रजी आणि विदेशी भाषा अधिविभागांमध्ये नवीन प्रवेशित विद्यार्थी आणि प्रशासनातील अधिकारी यांचा संवाद घडवून आणण्यासाठी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ इंडक्शन प्रोग्रामाचे राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजन केले होते. त्यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते.

कुलगुरू शिर्के म्हणाले, विद्यापीठ परिसर स्वच्छ, सुंदर ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला पाहिजे.

यासाठी एनएसएस विभागामार्फत प्रयोगशील उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल. प्रगतीचा ध्यास घेऊन उच्च पातळीवर जाण्यासाठी विद्यार्थी नेहमी प्रयत्नशील राहिले पाहिजेत.

याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी जिज्ञासा जागृत केली पाहिजे. या ठिकाणी विद्यार्थ्यांकरिता आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत, त्याचा लाभ घेतला पाहिजे. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी स्वागत केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी आभार मानले.

यावेळी क्रीडा अधिविभाग संचालक डॉ. शरद बनसोडे, तानाजी चौगुले, डॉ. मेघा पानसरे, डॉ. रणधीर शिंदे, उपकुलसचिव भक्ती नाळे उपस्थित होते.

लोकमत

# लोकनिधीतून साकारणार विद्यार्थिनींसाठी वसतिगृह

## शिवाजी विद्यापीठाचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची वसतिगृहाअभावी राहण्याची गैरसोय होऊ नये, यासाठी विद्यापीठाने लोकसहभागातून लोकांच्या स्मृती जतन करू शकेल, अशा वसतिगृहाची संकल्पना समोर आणली आहे. या प्रस्तावाला व्यवस्थापन परिषदेची मान्यता प्राप्त झाल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. काही देणगीदारांनी उत्स्फूर्तपणे असा निधी देण्याची तयारी दर्शविली असल्याचेही त्यांनी सांगितले.

डॉ. शिर्के म्हणाले, लोकांचा सहभाग ही यामागील मुख्य कल्पना आहे. त्यानुसार लोकांनी आपले कुटुंबीय, आप्तस्वकीय यांच्या नावे ठरावीक निधी विद्यापीठाकडे द्यायचा आणि त्या व्यक्तीच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या नावे निवासी खोल्यांची उभारणी करायची, अशी ही कल्पना आहे. ही योजना खुली असून, या वसतिगृहात २०० विद्यार्थिनींची राहण्याची सोय होईल. सध्याचा बांधकामाचा दर लक्षात घेता प्रती विद्यार्थिनी किमान ३.२५ लाख रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.

ज्या देणगीदारांना अधिक देणगी द्यावयाची इच्छा असेल, त्यांनी भोजनालय, सभागृह, ग्रंथालय किंवा संगणक कक्ष अशा सुविधांसाठी द्यावी. याबाबतची सविस्तर माहिती अभियांत्रिकी विभागात उपलब्ध करण्यात येत असल्याचेही कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. या योजनेसाठी निधी संकलित करीत असताना फर्स्ट कम फर्स्ट बेसिसवर देणगी स्वीकारली जाईल, असे डॉ. शिर्के यांनी सांगितले.

पुढारी

# 'केस स्टडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विकसित करावे'

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

केस स्टडी हे व्यवस्थापनशास्त्रातील प्रभावी माध्यम आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करावे, असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

विद्यापीठातील वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागातील एमबीए युनिट, शिवाजी विद्यापीठ मॅनेजमेंट टीचर्स असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय प्राध्यापक विकास कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. जमनालाल बजाज मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा. डॉ. श्रीनिवासन अय्यंगार, वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एस. एस. महाजन प्रमुख उपस्थित होते. डॉ. दीपा इंगवले यांनी स्वागत केले. सुम्टाचे सचिव डॉ. प्रवीण जाधव यांनी आभार मानले. यावेळी निमित मल्होत्रा, अनिरुद्ध कुलकर्णी, एमबीएचे प्र. संचालक प्रा. डॉ. ए. एम. गुरव, सुम्टाचे अध्यक्ष डॉ. बी. एस. सावंत उपस्थित होते.

पुढारी



कोल्हापूर : शहाजी छत्रपती महाविद्यालयातील नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. के. व्ही. मारुलकर. सोबत डॉ. एन. एल. कदम, प्राचार्य आर. के. शानेदिवाण आदी.

# नवीन शैक्षणिक धोरणामुळे कौशल्यपूर्ण विद्यार्थी तयार होतील : डॉ. मारुलकर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये कौशल्य आधारित कोर्सेस सुरू करण्यात आले आहेत. ते विद्यार्थ्यांना सक्तीचे करण्यात आले आहेत. नवीन शैक्षणिक धोरणामुळे यापुढे कौशल्याधारित विद्यार्थी तयार होतील, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील कॉमर्स विभागाचे बीओएस चेअरमन डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी केले.

शहाजी छत्रपती महाविद्यालयातील एम. कॉम. विभागाच्या वतीने एम. कॉम. विभागाचा बदललेला अभ्यासक्रम आणि नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यावर एक दिवसीय कार्यशाळेप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते. शिवाजी विद्यापीठातील अकौंटन्सी विभागाचे बीओएस चेअरमन डॉ. एन. एल. कदम यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. महादेव शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सी. के. पाटील, प्रा. शरयू शेवडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संतोष कांबळे यांनी कार्यशाळेचा आढावा घेतला. कार्यक्रमास प्रबंधक मनीष भोसले, डॉ. आर. डी. मांडणीकर, डॉ. सुनीता राठोड, डॉ. पांडुरंग पाटील उपस्थित होते.

पुण्यनगरी

# नव्या धोरणांमुळे कौशल्याधारित विद्यार्थी घडतील : डॉ. मारुलकर

## शहाजी महाविद्यालयात शिक्षण धोरणांवर कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांमध्ये कौशल्य आधारित कोर्सेस सुरू करण्यात आले असून, ते विद्यार्थ्यांना सक्तीचे केले आहेत. यामुळे यापुढे कौशल्याधारित विद्यार्थी नवीन शैक्षणिक धोरणांमुळे तयार होतील, असा विश्वास शिवाजी विद्यापीठातील कॉमर्स विभागाचे बीओएस चेअरमन डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी व्यक्त केला. श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील एम. कॉम. विभागातर्फे आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते. डॉ. एन. एल. कदम यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. महादेव शिंदे यांनी, सूत्रसंचालन प्रा. सी. के. पाटील व प्रा. शरयू शेवडे यांनी केले. कॉमर्स विभागप्रमुख प्रा. संतोष कांबळे यांनी कार्यशाळेचा आढावा घेतला. प्रा. उज्ज्वला पाटील यांनी आभार मानले.

चेअरमन मानसिंग बोंद्रे, मानद सचिव संगीता बोंद्रे यांचे प्रोत्साहन मिळाले. प्रबंधक मनीष भोसले, डॉ. आर. डी. मांडणीकर, डॉ. सुनीता राठोड, ग्रंथपाल डॉ. पांडुरंग पाटील आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठातर्फे स्टार्टअप स्पर्धा

**कोल्हापूर :** उदयोन्मुख उद्योजकांना प्रोत्साहित करून स्टार्टअप्सना नवरोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिलतर्फे इंटर-इन्स्टिट्यूशनल स्टार्टअप स्पर्धेचे आयोजन केले आहे.

भारत सरकारच्या स्टार्टअप इंडियाच्या माध्यमातून नोंदणीकृत स्टार्टअप या स्पर्धेत भाग घेण्यास पात्र आहेत. स्पर्धेत भाग घेण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर माहितीपत्रक उपलब्ध असून, ऑनलाईन रजिस्ट्रेशनच्या माध्यमातून सहभागी होता येईल, असे पत्रकात नमूद केले आहे.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात मंगळवारी स्टार्टअप इंडियाचे आयोजन

**कोल्हापूर :** स्टार्टअपचे परीक्षण व मूल्यांकन २९ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित केले आहे. स्टार्टअप इंडिया माध्यमातून नोंदणीकृत स्टार्टअप भाग घेण्यास पात्र आहेत. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी २६ ऑगस्टपर्यंत नोंदणी करता येणार आहे. विजेत्यांना प्रथम ५ हजार, द्वितीय ३ हजार आणि तृतीय क्रमांक २ हजार रूपयांचे रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल, शिवाजी युनिव्हर्सिटी सेंटर फॉर इनोव्हेशन इंक्युबेशन अँड लिंकेजेस तसेच एस. यु. के. रिसर्च अँड डेव्हलपमेंट फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्टार्टअप स्पर्धेचे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करून नोंदणीकृत स्टार्टअपची माहिती भरून सहभागी होता येईल. सहभागी स्टार्टअपचे तज्ज्ञ परीक्षकांमार्फत बिझनेस प्लॅन व डेमोस्ट्रेशनच्या माध्यमातून मूल्यांकन होईल. स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली यांनी केले आहे.